महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा
स्व.सौ.वेणूताई यशवंतराव चव्हाण उपजिल्हा रुग्णालय, कराड. जि.सातारा.
डॉ.श्रीम.एस.एस.लाळे, वैदयकीय अधीक्षक (गट अ) दुरध्वनी क्र.०२१६४-२२१०२०
email address- mskarad@gmail.com

आरोग्य सेवा

जा.क्र./उजिरुक/औभां/दरपत्रक/ ९९ /२५

(व्दितीय निविदा)

दिनांक :- १० /०३/२५

विषय :- उपजिल्हा रुग्णालय, कराड कडील औषध भांडाराकरीता लागणा-या औषधांची दर करारपत्रके सादर करणेबाबत...

उपरोक्त विषयान्वये या रुग्णालयातील एस.एन.सी.यु विभागाकरीता दि. १८मार्च२०२५ ते दि.२८ फेब्रुवारी २०२६ अखेर खरेदी करण्याकरीता सोबत प्रपत्रात नमुद केलेप्रमाणे औषधांची स्वतंत्र दरकरारपत्रके मागविणेत येत आहेत.

दरपत्रकासाठी नियम व अटी:-

१) इच्छुकांनी सोबतऔषधांची स्वतंत्र दरकरारपत्रके शासनाचे प्रचलित नियमानूसार सर्व अटी (**GST** सर्व्हीस चार्ज) व शर्तीच्या अधिन राहून दरकरारपत्रके सादर करावीत.

२) सर्व दरकरारपत्रके सिलबंद लखोटयातून विहीत नमुन्यात दि.१०/०३/२०२५ ते दि. १७/०३/२०२५ पर्यंत पोस्टाने किंवा कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करणेची आहेत. उशिरा प्राप्त होणा-या दरकरारपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

३) सदर दरकरारपत्रकांचा दर दि.२८/०२/२०२६ अखेर बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

४) दरकरारपत्रके पोहोच करणेचे ठिकाण वैद्यकिय अधिक्षक वर्ग-१, उपजिल्हा रुग्णालय कराड कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत. (सुट्टी वगळता)

५) औषधांची यादी कमी जास्त होऊ शकते. यासाठी कोणतेही सबब दिले जाणार नाही.

६) दरपत्रकासोबत अन्न व औषध प्रशासन विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र (Drug Licence Certificate) (छायांकित) सोबत जोडणे आवश्यक आहे.

७) दरकरारपत्रके उघडताना दरकरारपत्रकधारकास हजर राहता येईल.

८) दरकरारपत्रके दि. १८/०३/२०२५ रोजी वैद्यकिय अधिक्षक वर्ग - १ उपजिल्हा रुग्णालय कराड यांचे कार्यालयात दुपारी ३.०० वाजता उघडली जातील यासाठी स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

Scanned with OKEN Scanner

९) कोणतेही कारण न देता कोणतेही दरकरारपत्रके स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा प्रक्रिया स्थगित ठेवण्याचा अधिकार वैद्यकिय अधिक्षक वर्ग - १ यांनी राखुन ठेवला आहे.यासाठी कोणतेही तोंडी अथवा लेखी कारण दिले जाणार नाही अगर पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१०) सदर मान्य पुरवठाधारकास देयकाची रक्कम ही अकौंट पेयीचेक (CMP/PFMS) द्वारेच औषधांचा पुरवठा झाल्यानंतर अदा केली जाईल.कोणत्याही परिस्थितीमध्ये खर्चाचे अग्रीम देय असणार नाही.

११) सदर औषधांचा पुरवठा मागणीप्रमाणे पुरवठा आदेशापासून तीन दिवसात डोअर डिलीव्हरी देण्याचे बंधनकारक आहे

१२) सर्व औषधांचे दर एक युनिट प्रमाणे देण्यात यावेत,

१३) स्थानिक पुरवठादार असल्यास प्राधान्य.

(signature)

वैद्यकिय अधिक्षक वर्ग-१,
उपजिल्हा रुग्णालय, कराड.
जि.सातारा.

Medicine List

| S.No. | Drug Name | Unit |
|---|---|---|
| 1 | Inj. Lung Surfactant 3ml ( Neosurf) | 1 Amp |

Scanned with OKEN Scanner

## आवश्यक ती कागदपत्रे माहिती

१)शॉप अॅक्ट सर्टिफिकेट, उदयोग आधार, आवश्यक तेथे ड्रग्ज लायसेन्स, पॅन कार्ड, आधार कार्ड, जीएसटी नंबर/सर्टिफिकेट. पुरवठादार/अधिकृत विक्रेते/उत्पादक असल्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्रे.

२)अनुभवासाठी यापूर्वीचे खरेदी आदेश असल्यास जोडावेत.

३)दर हे सर्व करांसहित व एका युनिटचे भरावेत.

४)खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छुक संस्थेने एकल दरपत्रक देण्याबाबतची हमी देण्यात यावी. सोबत नमुना देत आहे.

५)दर सादर करताना सर्व साहित्य सामुग्रीची एक वर्षाची हमी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (साध्या कागदावर) देण्यात यावे तसेच कोणत्याही मालाचा मुदतबाहय दिनांक १ वर्षापेक्षा कमी नसावा. तसेच सदर दर हे एका वर्षासाठी बदलता येणार नाहीत व ते पुढील एका वर्षासाठी ग्राहय असतील.

६)माल हा डोअर डिलीव्हिरी स्वरुपात दयावा लागेल.

७)दर हे या कार्यालयाने दिलेल्या यादीतच भरावेत व प्रत्येक पानावर स्वाक्षरी व शिक्का असावा

८)वरील सर्व कागदपत्रे एका लिफाप्यात घालून ती सिलबंद करावीत.
लिफाप्यावर ज्या बाबीसाठी दरपत्रक सादर करतोय त्याचा स्पष्ट उल्लेख करावा. तसेच उजव्या बाजूस खाली आपल्या फर्मचा शिक्का व स्वाक्षरी असावी.

Scanned with OKEN Scanner

# हमीपत्र नमुना

प्रमाणित करण्यात येते की मी..................(नाव) व माझी.............(फर्मचे नाव) यांचे खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर कोणतेही हितसंबंध नाहीत. तसेच मी केवळ एकच दरपत्रक सादर करीत आहे. माझ्या किंवा माझ्या जवळच्या कुटुंबाचा हितसंबंध असलेली इतर कोणतेही दरपत्रक या दरपत्रकाव्यतिरिक्त सादर करीत नाही.

स्वाक्षरी व शिक्का

Scanned with OKEN Scanner

# साध्या कागदावर दयायचे प्रमाणपत्र

असे प्रमाणित करतो की या दरपत्रकात नमूद केलेल्या सर्व साहित्य सामुग्रीची एका वर्षाची हमी देण्यात येत आहे. सदर कालावधीत सदर माल खराब झाल्यास किंवा काही कारणांमुळे बदलणे आवश्यक असल्यास तो मी विनाशर्त, तात्काळ, कोणतीही अतिरिक्त रक्कम न घेता बदलून देईल.

कोणत्याही मालाचा मुदतबाहय दिनांक १ वर्षापेक्षा कमी नसेल....तसेच सदर दर हे आपले दर मान्य झाल्यापासून पुढील एका वर्षासाठी बदलता येणारं नाहीत व ते पुढील एका वर्षासाठी ग्राहय असतील व या कार्यालयास याच दराने पुरवठा करावा लागेल याची मला कल्पना आहे.

वरील अटींची पूर्तता न केल्यास माझ्या संस्थेचे नाव काळया यादीत समाविष्ट करण्यात येवून योग्य ती प्रशासकिय कारवाई करण्यात येईल याची मला कल्पना आहे.

Scanned with OKEN Scanner